बीड नगर परिषदेचा अजब कारभार

# चक्क आरक्षण असलेल्या भुखंडावरच केले लेआउट

आरक्षण क्रं.१३१, १३३,३७,१०७,१०८ या आरक्षित जागेवर केलेल्या लेआउटची सविस्तर बातमी उद्याच्या अंकात

वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/50939-L/230/RNP/Beed/2025-27 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-गुरूवार दि. १० जुलै २०२५ पाने ४ किंमत ३






## आता काय सांगणार....
## अरेबियन ज्वेलर्सच्या योजनेत भाग घेणाऱ्या बीड शहराची पब्लिक

## बीडकरांनो,बघा आता नावही निघाले

बीड : शहरात मोठ्या धुम धडाक्यात आणि मोठे मोठे आमिष दाखवून सुरू करण्यात आलेले अरेबियन ज्वेल्सने आपला बोराबिस्तर पुर्णतः गुंडाळलेले आहे. आता या दुकानाच्या नावावरच बोर्ड ही काढून टाकण्यातआलाअसून आता त्याचे पुन्हा बीडला येण्याचे संकेत दिसून येत नाहीत. म्हणून आता काय सांगणार... अरेबियन ज्वेलर्सच्या मोठ मोठ्या योजनेत भाग घेणाऱ्या बीड शहराची मालदार पब्लिक....

# गद्दार कुणाला म्हणतो रे? बाहेर भेट मी बघतो

## अनिल परब विरुद्ध शंभूराज देसाईंचा सभागृहातला राडा




Email.- dailydivyawarta@Gmail.com
Email.-editordivyawarta@gmail.com

# दिव्य वार्ता

मुंबई , (दिव्य न्युज):- आज विधान परिषदेच्या सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला अनिल परब विरुद्ध शंभूराज देसाई यांचा सामना रंगल्याचं पाहण्यास मिळालं. या दोघांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. चिडलेल्या अनिल परब यांनी शंभूराज देसाईंना गद्दार असं संबोधलं. ज्यानंतर शंभूराज देसाईंनी गद्दार कुणाला म्हणतो रे? बाहेर भेट मी बघतो असं करत अनिल परब यांना ललकारलं होतं. हा वाद इतका वाढला की विधान परिषदेचं कामकाज काही वेळासाठी तहकूब करावं लागलं. त्यानंतर विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी या वादातले आक्षेपार्ह शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकत असल्याचं जाहीर केलं. दरम्यान माध्यमांशी बोलत असताना शंभूराज देसाईंनी सभागृहात काय घडलं ते सांगितलं.

शंभूराज देसाई म्हणाले, विधान परिषदेच्या सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाला मिलिंद नार्वेकर यांनी एक प्रश्न विचारला होता. मराठी माणसाला घरं उपलब्ध करुन देण्यासंबंधीची ही चर्चा होती. मी दिलेल्या उत्तराने काही अंशी मिलिंद नार्वेकर हे समाधानी होते. उपप्रश्न चित्रा वाघ यांनी विचारला. चित्रा वाघ म्हणाल्या या पूर्वीच्या सरकारमध्ये असं धोरण होतं का? ज्यावर उत्तर देताना मी सांगितलं यापूर्वीच्या महाविकास आघाडी सरकारमध्ये उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मराठी भाषिक लोकांच्या घरांसंदर्भातलं धोरण आणलं नव्हतं. मी उद्धव ठाकरेंचा उल्लेख केल्यानंतर अनिल परब यांना राग आला आणि ते जोरजोरात तुम्ही पण मंत्री होतात, तुम्ही का बोलला नाहीत? हे विचारु लागले. मी त्यांना म्हणालो तुम्ही तर कॅबिनेट मंत्री आणि उद्धव ठाकरेंच्या जवळचे होतात मग तुम्ही

▸▸ पान २ वर

### त्यांनी जर वाद वाढवला तर आम्ही दुप्पट वाढवणार

आता वाद संपला आहे का? असं विचारलं असता शंभूराज देसाई म्हणाले, ते अरे कारे करु लागले मी पण तशीच भाषा वापरली. अनिल परब बघतो म्हणाले मी पण तेच म्हणालो यापेक्षा अधिक काहीही घडलं नाही. त्यांनी जर वाद वाढवला तर दुप्पट वाद वाढवायची आमची तयारी आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरेंनी आम्हाला आरे ला कारे नेच उत्तर द्यायचं शिकवलं आहे. असं पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी माध्यमांना सांगितलं.

### मुलींनो, आपले नवरे ओळखा, म्हणणाऱ्या

## नराधम शिक्षकाला कारवाईचा दणका

### सीईओ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ईओंसह बीईओंनी गतीने केली कारवाई, झेडपीकडून निलंबन तर गुन्हाही दाखल

केज, (दिव्य न्युज):- केज तालुक्यातील सुर्डी (सोनेसांगवी) येथील जिल्हा परिषद शाळेतील एका नराधम शिक्षकाने चक्क सहावीच्या वर्गात शिकत असलेल्या अल्पवयीन मुलीची छेड काढून शिक्षण क्षेत्राला आणि शिक्षकी पेशाला काळिमा फासण्याचा निंदनीय प्रकार केला आहे. हा खळबळजनक प्रकार उघड झाल्यामुळे नागरिकांत तीव्र संतापाची लाट निर्माण झालेली आहे.

दि.३ जुलै २०२५ रोजी गुरूवारी दुपारी २:०० वा. च्या दरम्यान शाळेच्या मध्यंतर वेळी कॅरम खेळत असलेल्या सहावीच्या मुलींच्या अंगाला वाईट हेतूने स्पर्श केला आणि त्यांच्याशी तुमचे नवरे निवडा, अशा प्रकारे बोलून त्यांना लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. त्या नंतर एका मुलीनी हा प्रकार घरी तिच्या पालकांना सांगितला. त्यानंतर दि. ८ जुलै रोजी एका पालकाने गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या बाबतची लेखी तक्रार त्यांना सादर केली. घटनेचे गांभीर्य ओळखून तत्काळ स्वतः गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर, केंद्र प्रमुख अर्जुन बोराडे व केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांनी शाळेला भेट देऊन चौकशी केली.

सदर प्रकाराविषयी जिल्हा

▸▸ पान २ वर

### दुधात भेसळचे प्रमाण वाढले

## लहान मुलांसह आजारी वृध्दांच्या प्रकृतीवर परिणाम



बीड, (दिव्य न्युज):- बीड शहरात लोकसंख्या आधारे दुध मागणाऱ्यांची संख्या ही मोठ्या प्रमाणात आहे. शहरात पाकिटबंद दुध सह ग्रामीण भागातून येणाऱ्या दुध विक्रेत्यांकडून खुले दुध विक्री होत आहे. काहीजण पाकिटबंद दुध वापरतात तर काहीजण खुले विक्रेत्यांकडून दुध घेतात पण यामध्ये भेसळचे प्रमाण वाढले असून दुधामध्ये काही तरी भेसळ करून दुध विक्री होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून अशा पध्दतीने

▸▸ पान २ वर

### लव्ह जिहादचा 'एफसी रोड पॅटर्न' सांगणाऱ्या

## गोपीचंद पडळकरांना हिंदू व्यापाऱ्यांनी तोंडघशी पाडलं



पुणे , (दिव्य न्युज):- पुण्यामधील प्रसिद्ध एफसी रोडवर 'लव्ह जिहाद'चा पॅटर्न सुरू असल्याचे भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी म्हटले होते. 'काही मुलांनी मला सांगितलं की

▸▸ पान २ वर

## भूमी अधिग्रहणाचा मावेजा थकवल्याने माजलगावच्या उपविभागीय कार्यालयातील साहित्य जप्त



माजलगाव , (दिव्य न्युज):- भूमी अधिग्रहण प्रकरणातील तब्बल ५७ लाख रुपयांच्या मावेजा रकमेची अंमलबजावणी न केल्याने माजलगाव येथील दिवाणी न्यायालयाने शासन आणि संपादन संस्थांच्या मालमत्तांवर थेट जप्ती आणण्याचे आदेश दिले आहेत. या निर्णयामुळे प्रशासकीय यंत्रणेत मोठी खळबळ उडाली आहे. याबाबत मंगळवारी सायंकाळी जप्तीची कारवाई करण्यात आली असून उपविभागीय अधिकारी कार्यालयातील टेबल, खुर्ची, कॉम्प्यूटर, बॅटऱ्या आदि साहित्य ताब्यात घेण्यात आले आहे.

▸▸ पान २ वर

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मोदींना निवृत्तीचे संकेत

### ठाकरे गटाचा टोला

मुंबई , (दिव्य न्युज):- सरसंघचालक मोहन भागवत यांनी मोरोपंत पिंगळेंची आठवण सांगत पंचहात्तरीबाबत एक विधान केलं. पंचाहत्तरीची शाल अंगावर आली की निवृत्त व्हायचं असतं असं मोहन भागवत यांनी पुस्तक प्रकाशनाच्या एका कार्यक्रमात म्हटलं होतं. मोरोपंत पिंगळे यांना निवृत्त होण्यास सांगण्यात आलं तेव्हा ते निवृत्त झाले असंही मोहन भागवत म्हणाले. मोहन भागवत यांच्या विधानाची चर्चा रंगली आहे. दरम्यान याबाबत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे

▸▸ पान २ वर


### बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात १५०० कोटींचा भ्रष्टाचार?

## पती मेल्याचे दाखवून ३ महिलांनी लाटले ६ लाख रुपये, एकाने पत्नी मेल्याचे दिले बनावट प्रमाणपत्र

मुंबई , (दिव्य न्युज):- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणीकृत कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांस तथा वारसाला दोन लाख रुपये मिळतात. याच संधीचा फायदा घेऊन एका व्यक्तीने पत्नी मयत झाल्याचे तर चार महिलांनी पती मरण पावल्याची बनावट मृत्युपत्रे काढून मदतीसाठी अर्ज केले. त्यातील तिघींना पैसेही मिळाले, पण त्यांचे बिंग फुटले आणि त्या पाच जणांविरुद्ध सोलापुरातील फौजदार चावडी पोलिस ठाण्यात शासनाची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

नोंदणीकृत बांधकाम कामगारास संसारोपयोगी साहित्य मिळते, त्यांच्या मुलांना शिष्यवृत्ती, शिक्षणासाठी अर्थसाहाय्य, कामगारास अपंगत्व आल्यास आर्थिक मदत, नैसर्गिक किंवा अपघाती मृत्यू झाल्यास वारसांना आर्थिक मदत, असे लाभ मिळतात. त्यामुळे अनेकांनी एजंटांच्या

▸▸ पान २ वर



## मालमत्ता कर थकीत असलेल्या बीड शहरातील नागरिकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा -नाईकवाडे, पटेल

बीड , (दिव्य न्युज):- बीड नगरपालिकेत मालमत्ता कराच्या व्याजावर ५० टक्के सुट देण्याची सवलत अभय योजने अंतर्गत बीड नगरपालिकेने दिली असून यामुळे नागरिकांचा आर्थिक बोजा कमी होणार असून गरजू नागरिकांनी अभय योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेवक अमर नाईकवाडे, गटनेते फारुक पटेल यांनी केले आहे.

पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, राज्यातील नगरपालिका/नगरपरिषद व नगरपंचायती क्षेत्रामध्ये अनेकवेळा मालमत्ता





कराची थकबाकीची रक्कम जास्त असणे, मालमत्ता धारकांची आर्थिक अडचण असणे व इतर कारणांमुळे मालमत्ता कराचा भरणा करण्यात येत

▸▸ पान २ वर

१२ जण मृत्युमुखी, २० लोक पडले, ५ जणांना वाचवले

# ४०वर्षे जुन्या पुलाचा स्लॅब कोसळला, ९ वाहने नदीत

गुजरात, (दिव्य न्युज):- गुजरातमधील वडोदरा जिल्ह्यातील पादरा तालुक्यात ४० वर्षे जुना गंभीरा पुलाचा १२ मीटर लांबीचा प्री-स्केप स्लॅब बुधवारी सकाळी ७:५५ वाजता हादऱ्यांमुळे कोसळला. यावेळी पुलाच्या दोन्ही बाजूंनी येणारे दोन ट्रक, दोन पिकअप व्हॅनसह ९ वाहने ११० फूट खोल महिसागर नदीत कोसळली. एक टँकर पुलाच्याकाठावर अडकला. या अपघातात २ मुलांसह १३ जणांचा मृत्यू तर ५ जण जखमी झाले. ५ जण बेपत्ता आहेत. गेल्या ४ वर्षांत गुजरातमधील ही पूल कोसळण्याची १६ वी घटना आहे. गंभीरा पूल मध्य व दक्षिण गुजरातला जोडतो. पादरातील २५ कंपन्यांचे २० हजार कर्मचारी दररोज पूल ओलांडतात. पूल जीर्ण झाल्यामुळे नवीन पुलासाठी ३ महिन्यांपूर्वी २१२ कोटी मंजूर करण्यात आले आहेत.

## पिलर आणि प्री-स्केप स्लॅब यात होते अंतर, रिपोर्ट दडवला

हा पूल १९८५ मध्ये सुरू झाला. चार वर्षांपासून त्याच्या खांब आणि स्लॅबमध्ये अंतर होते. त्यामुळे कंपन वाढत होते. मुजपुरा जिल्हा पंचायत सदस्य हर्षद सिंग परमार यांनी ४ ऑगस्ट २०२२ रोजी वडोदरा जिल्हाधिकाऱ्यांकडे याबाबत तक्रार केली. पथकाने पुलाचे खड्डे भरले, परंतु पुलाचा तपास अहवाल नकारात्मक असूनही तो सुरू ठेवला. हर्षदच्या मते, प्रशासनाने अहवाल दडवून ठेवला आहे.



# ठाकरेंचा इतिहास काढला, ते सुध्दा मगध मधून आलेत

## महाराष्ट्राने स्वीकारले अन् आता ते मराठीसाठी लढा देत आहेत-शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद

मुंबई, (दिव्य न्युज):- मराठी भाषेवर कोणाचे प्रेम असेल, तर त्यावर कोणाचा आक्षेप असण्याचे कारण नाही. मराठीचा प्रचार, प्रसार करण्यासाठी कोणी कटिबद्ध होत असेल, तर यावर आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु, मराठी भाषेसाठी कुणी कानशिलात लगावायला लागले, तर त्या भाषेचे यश वाढेल का? केवळ महाराष्ट्रात राहणारे लोकच मराठीवर प्रेम करतात, असे आपल्याला वाटते का, संपूर्ण देश मराठीवर प्रेम करतो, असे प्रतिपादन शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केले. चातुर्मासाची सुरुवात झाली असून, शंकराचार्य मुंबईत आहेत.मराठी भाषिक लोक देशभरात जाऊन कार्य करत आहेत. देशाबाहेरही अनेक ठिकाणी मराठी शिकवली जाते. प्रत्येकाला एकापेक्षा जास्त भाषा येतीलच असे नाही. प्रत्येक जण बहुभाषिक असेल असे नाही. देशात केवळ एकच भाषा येणाऱ्यांची संख्या जास्त आहे. त्यामुळे सगळ्यांना मराठी आली पाहिजे किंवा सगळ्यांनी मराठी शिकली पाहिजे, असा आग्रह तुम्ही कसा काय धरू शकता, अशी विचारणा शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केली.

आज जे लोक मराठीचा आग्रह धरत आहेत, त्यांचा इतिहास सर्वांसमोर आहे. त्यांच्याच पूर्वजांनी आपले चरित्र लिहिले आहे, आपल्या कुटुंबाचा इतिहास लिहिला आहे. ठाकरे महाराष्ट्राच्या बाहेरून आले होते. ठाकरे मगधमधून आले होते. तेव्हा तेही मराठी नव्हते. त्यांनाही मराठी येत नव्हती. तेव्हा महाराष्ट्राने त्यांना स्वीकारले. मगध येथून आलेल्या कुटुंबाचा स्वीकार केला. त्यांना मोठे मराठी भाषिक केले आणि तेच आता मराठीसाठी लढा देत आहेत. मगध येथील मागधी भाषा विसरले आणि मराठी स्मरणात राहिली. महाराष्ट्रातील लोकांनी आपल्या पूर्वजांना प्रेम दिले. ते आपण पुढे का नेत नाहीत. लोकांना एवढे प्रेम द्या की, ते त्यांची भाषा विसरून मराठी स्वीकारतील. हा मार्ग तुम्ही का स्वीकारत नाही, असा सवाल शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती यांनी केला.



पान १ वरून

## गद्दार कुणाला

का बोलला नाहीत. आम्ही हे बोलत असताना अनिल परब यांनी तुम्ही तर गद्दारी करत होतात, असं शब्द वापरला. मी त्यामुळे त्यांच्याच भाषेत उत्तर दिलं की तुम्ही तिथे काय चाटायचा प्रयत्न करत होतात? आम्हाला गद्दार शब्द वापरल्यानंतर वाद झाला. त्यानंतर बाचाबाची झाली.

नीलम गोऱ्हे यांनी वाद झालेलं भाष्य रेकॉर्डवरुन काढलं-देसाई

विधान परिषदेच्या उपसभापती नीलमताईंनी जे योग्य वाटलं नाही ते भाष्य काढून टाकण्याचे आदेश दिले. मात्र मी सांगू इच्छितो की आम्हीही बाळासाहेब ठाकरेंचे शिवसैनिक आहोत. आम्ही तीन लाख लोकांनी निवडून आलेले लोक आहेत. आम्हाला मोठ्या आवाजात कुणी बोलेल, अपमान करेल, सभागृहात बदनामी करेल तर कुणीही असला तरीही आम्ही सहन करणार नाही. असं देसाईंनी माध्यमांना सांगितलं.

## नराधम शिक्षकाला

परिषदेच्या शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी (प्रा.) फुलारी यांच्याशी दूरध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी या दोषी शिक्षकावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावर असल्याची माहिती दिली.

अद्याप पोलिसांत गुन्हा दाखल नाही : -

पीडित मुलीच्या पालकांनी गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार केलेली असून त्यांनी युसुफवडगाव पोलीस ठाण्याची संपर्क साधलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्या नराधम शिक्षकावर गुन्हा दाखल झालेला नाही.

मागील वर्षी देखील याच नराधम शिक्षकाने केली होती आगळीक ! :-

मागील वर्षी देखील या शिक्षकाने एका शालेय विद्यार्थिनीचा विनयभंग केला होता परंतु त्याची गावात वाच्यता झाल्या नंतर सदर प्रकरण हे गावातच तडजोड करून मिटविण्यात आले असल्याची माहिती समजते आहे.

शिक्षण विभागाने सुद्धा पोलिसांत तक्रार द्यायला हवी :-

या प्रकरणी पालकांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिलेली नाही परंतु त्यांनी गटक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार दिली असल्याने त्या संदर्भात त्यांनी पोलिसांना माहिती द्यायला हवी. कारण सदर शिक्षक हा सावकारी आणि प्लॉटिंगच्या व्यवसायात असल्याने तो पालकावर दडपण आणण्याची शक्यता आहे.

गटशिक्षाधिकाऱ्याकडे दिली शिक्षकाने त्याच्या गैरकृत्याची कबुली :-

गटशिक्षणाधिकारी यांनी शाळेला भेट देऊन माहिती घेतली असता त्या नराधमाने त्याने केलेल्या गैरकृत्याची कबुली दिली असल्याची माहिती मिळत असून चौकशी अहवालात गट शिक्षणाधिकारी यांनी त्याचा उल्लेख केला असल्याची माहिती मिळते आहे.

पालक आणि विद्यार्थ्यात भीतीचे वातावरण :या भयानक प्रकारामुळे शाळेत शिकणारे विद्यार्थी आणि पालक यांच्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## गोपीचंद पडळकरांना

एफसी रोडला एक मुलींच्या कपड्याचे दुकानाच्या माध्यमातून लव्ह जिहाद सुरू आहे. इतर ठिकाणी जो ड्रेस चारशे रुपयाला मिळतो तो ड्रेस त्या दुकानांमध्ये दोनशे रुपयाला मिळतो. त्यामुळे स्वस्त असल्याने आपल्या सगळ्या मुली त्याच दुकानांमध्येच खरेदी करायला जातात. शंभर मुली झाल्या की त्यांना टार्गेट केलं जातं. त्यांचे नंबर मिळवले जातात, त्यांना संपर्क करून त्यातील चार-पाच मुलींना लव्ह जिहादला बळी पाडलं जातं', असा दावा पडळकर यांनी केला होता.

गोपीचंद पडळकर यांच्या दाव्याने एकच खळबळ उडाली होती. आता एफसी रोडवर व्यवसाय करणाऱ्या हिंदू व्यापारांनी देखील आपली भूमिका मांडली आहे. असा कोणताही प्रकार एफसी रोडवर घडला असल्याचे अद्याप आमच्या निदर्शनास आलेलं नाही. तसं घडलं असतं तर सर्वप्रथम इथल्या हिंदू व्यापाऱ्यांनी हे सर्व प्रकार हाणून पाडले असता, असे म्हणत पडळकर यांच्या दाव्यातील हवाच येथील व्यापाऱ्यांनी काढून टाकली.

आतापर्यंत अशी कोणत्याही घटनेची तक्रार ही पोलिसांमध्ये देखील झालेली नाही. एफसी रोड मार्केटमध्ये अनेकदा रोहिंग्या, बांगलादेशी काम करत असल्याबाबत हिंदू संघटना दावा करतात मात्र आत्तापर्यंत तरी असा कोणताही कर्मचारी या ठिकाणी सापडलेला नाही. या सर्व आरोपांमुळे आमच्या व्यावसायावर परिणाम होत असल्याचे देखील व्यापाऱ्यांनी सांगितले आहे.

एफसी रोड व्यापारी संघटनेचे अध्यक्ष शाम मारणे यांनी पडळकरांचे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. मारणे म्हणाले, कोणतेही प्रकार घडल्याचे आमच्या निदर्शनास आलेलं नाही. आम्ही 'लव्ह जिहाद' सारख्या प्रकारास कोणतीही थारा देणार नाही. जर कोणते व्यक्ती मुलींना आमिष दाखवून फसवत असतील, तर तो प्रकार निंदनीय आहे. मात्र अशा कोणत्याही घटना आमच्या माहितीप्रमाणे घडलेल्या नाहीत.

जर खरोखरच असे काही घडले असते तर त्या घटना माध्यमांमध्ये ते गाजल्या असता आणि पोलिसांकडेही त्याची नोंद असती. परंतु पोलिसांकडे अशा स्वरूपाची कोणतीही तक्रार दाखल झालेली नाही. पडळकर जे म्हणतात तसा प्रकार घडत असेल तर त्यांनी तो थेट आमच्या निदर्शनास आणावा. आम्ही नक्कीच खबरदारी घेऊ, असे देखील मारणे यांनी सांगितले.

'ते' व्यापारी कोण माहीत नाही

याआधीही एफसी रोड परिसरात बांगलादेशी किंवा रोहिंग्या नागरिकांच्या वावराबाबत आरोप झाले होते, मात्र पोलिस तपासात हे आरोप निराधार ठरले होते, असे मारणे यांनी यांनी सांगितले. गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही याठिकाणी प्रामाणिकपणे व्यापार करत आहोत. मात्र रात्री १०-११ नंतर उशिरा एफसी रोड वरील व्यापाऱ्यांनी दुकान बंद केल्यानंतर इतर भागातून काही व्यापारी येतात ते कोण असतात याबद्दल आम्हाला माहिती नाही. मात्र ते २०० नव्हे तर १०० ला चार कपडे विकतात. त्यांच्याबाबत पोलिसांनी खबरदारी घेणं आवश्यक असल्याचेही मारणे म्हणाले.

## भूमी अधिग्रहणाचा मावेजा

या प्रकरणात दोन वेगवेगळ्या अर्जावर सुनावणी झाली. पहिल्या प्रकरणात, अर्जदार मोहन आश्रुबा नागरगोजे यांनी २६ लाख ६६ हजार ८०२ रूपये इतकी रक्कम वसूल करण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या आदेश २१ नियम ३० अन्वये अर्ज दाखल केला होता. ही रक्कम एलएआर ८७/२०११ मधील संपादन प्रकरणाशी संबंधित असून न्यायालयीन निर्णय मिळूनही संबंधितांनी मावेजा बाबत अंमलबजावणी केली नव्हती. दुसऱ्या प्रकरणात, वैजनाथ व इतर अर्जदारांनी दाखल केलेल्या प्रकरणात सुमारे ३० लाख रुपयांच्या वाढीव मावेजा बाबत अर्ज दाखल केला होता. हे बक्षीस २०१६ मधील संपादन प्रकरणाशी संबंधित असून, शासनाने अद्याप ते अंमलात आणले नव्हते.

या दोन्ही प्रकरणांत संबंधित सरकारी अधिकारी यांच्या वतीने दोन्ही प्रकरणास विरोध करण्यात आला. जिल्हाधिकारी हे जिल्ह्याचे प्रशासकीय प्रमुख असून केवळ कार्यवाही करणारे असल्याचे कारण पुढे करण्यात आले. मात्र न्यायालयाने या सर्व युक्तिवाद फेटाळून लावत अर्ज मंजूर केले. न्यायनिर्णयप्राप्त जिल्हाधिकारी यांच्या वतीने स्थगिती मिळवण्याचा प्रयत्न केला असला तरी प्रत्यक्षात कोणतीही स्थगिती मिळालेली नसल्याचेही न्यायालयाने स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, या प्रकरणात बॉम्बे उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने रिट याचिकांमधून स्पष्ट निर्देश दिले होते की, संबंधित शासकीय मालमत्तांवर तात्काळ जप्ती आणून ती विक्री करून तीन महिन्यांच्या आत अर्जदारांना रक्कम वितरित करण्यात यावी. यावर आधारितच माजलगाव येथील दिवाणी न्यायाधीश (ज्येष्ठ स्तर) स.स. बुद्रुक यांनी २ जुलै रोजी दोन्ही अर्जावरील निर्णय देताना विशेष बेलिफ कक्षामार्फत मालमत्ता जप्तीची कार्यवाही सुरू करण्याचे आदेश दिले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशांची अंमलबजावणी वेळेत व्हावी, यासाठी ही कठोर कारवाई केल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय यांच्या कार्यालयातील २० खुर्ची, २० कपाट, संगणक, बॅटरी व इन्व्हर्टर व इतर साहित्य जप्त करण्यात आले.शेतकऱ्यास मावेजा न दिल्याने यापूर्वी वेगळ्या प्रकरणात येथील उपविभागीय अधिकारी यांची खुर्ची जप्त करण्याचे आदेश दिले होते त्यानंतर त्याच प्रकारात बीडचे जिल्हाधिकारी यांची गाडी जप्त करून न्यायालयात हजर केली होती.

## लहान मुलांसह

होत असलेल्या भेसळयुक्त दुधामुळे लहान मुलांसह आजारी वृध्दांच्या प्रकृतीवर याचे थेट परिणाम दिसून येत असून या कडे अन्न भेसळ विभागाचे साफ दुर्लक्ष होतांना दिसून येत असून यासर्व दुधाची तात्काळ तपासणी करण्याची मागणी समाज सेवक हाजी महेबुब खान यांनी केली आहे.

बीड शहराला रोज लाखो लिटर दुधाची आवश्यकता आहे. शहरातील आजु बाजुच्या गाव खेड्यातून दुध विक्रेते आपल्या कॅंडीमधून खुले दुध विक्रीसाठी आणतात. त्या सोबत जिल्ह्याबाहेरील इतर जिल्ह्यातून विविध कंपनीच्या नावाने पाकिटबंद दुध मोठ्या प्रमाणात येत आहे. काही जण पाकिट बंद दुधघेतात तर अनेकजण दुधविक्रेत्यांकडून खुले दुध घेतात. याची संख्या सर्वात जास्त असून पण गेल्या काही महिन्यांपासून दुधामध्ये भेसळ करण्याचे प्रमाण वाढले आहे. हे दुध पिल्यानंतर त्याचे तात्काळ परिणाम दिसून येतआहे. लहान मुलांच्या आरोग्यावर याचा जास्त परिणाम होत असून त्या सोबत आजारी वृध्दांनाही याचा जास्त त्रास सहन करावा लागत आहे. म्हणून अन्न व भेसळ विभागाने या गंभीर प्रश्नाकडे तात्काळ लक्ष देवून पाकिटबंद दुध आणि खुले विक्रेत्यांच्या दुधाचे नमूने घेवून त्याची चाचणी करून ते लोकांच्या वापरासाठी योग्य आहे का? याची सखोल चौकशी करण्याची मागणी समाजसेवक हाजी महेबुब खान यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात केले असून याबाबत लवकरच अन्न भेसळ विभागाला याची तक्रार करण्यात येणार असल्याचेही पत्रकात म्हंटले आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

खासदार संजय राऊत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. संजय राऊत यांनी या वक्तव्यावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदींना लक्ष्य केलं आहे.

सरसंघाचालकांच्या वक्तव्यावर संजय राऊत काय म्हणाले?

मी या संदर्भात एक रोखठोक लिहिलं होतं. नरेंद्र मोदी संघ मुख्यालयात गेले होते. त्यावेळी काय चर्चा झाली त्याचा सारांशही मी लिहिला होता. ७५ वर्षे हे भाजपातलं निवृत्तीचं वय आहे. नरेंद्र मोदींनी लालकृष्ण आडवाणी, मुरली मनोहर जोशी, जसवंत सिंग यांना निवृत्ती स्वतःच्या स्वार्थासाठी लादली. आता सप्टेंबर महिन्यात नरेंद्र मोदी ७५ वर्षांचे होत आहेत. त्यांची दाढी पिकली आहे, त्यांच्या डोक्यावरचे केसही उडाले आहेत. जगभ्रमण करुन झालं आहे. सगळी सुखं भोगून गेलं आहे. आता जो नियम तुम्हीच केला आहे ७५ वर्षे वयाचा. मला वाटतं की राष्ट्रीय स्वयंसेवक संघ त्यांना सूचित करतं आहे की तुम्हाला निवृत्त व्हावं लागेल. त्यांना देश सुरक्षित हातांमध्ये सोपवावा लागेल. असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे. तसंच अमित शाह यांच्या मनात निवृत्तीचे विचार येत असतील तर देशासाठी हे शुभसंकेत आहेत असाही टोला संजय राऊत यांनी लगावला.

मोदींना निवृत्त व्हायचं आहे हे मोहन भागवत त्यांना विसरु देणार नाहीत-राऊत

७५ वर्षे निवृत्तीचा नियम आहे तो सगळ्यांसाठी समान आहे. लालकृष्ण आडवाणी असोत, नरेंद्र मोदी असोत किंवा अमित शाह.त्यांना आता निवृत्त व्हावं लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी जी वचनं देतात ती विसरतात. १५ लाख प्रत्येकाच्या खात्यात जमा करण्याचं वचन, गरीबी हटवण्याचं वचन, पाकिस्तानला धडा शिकवण्याचं वचन हे सगळं मोदी विसरले आहेत. मात्र तुम्हाला निवृत्त व्हायचं आहे ही बाब देश मोदींना विसरु देणार नाही तसंच सरसंघचालक मोहन भागवतही विसरु देणार नाहीत.

मुंबई वाचवायची असेल तर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी एकत्र लढलं पाहिजे ही लोकभावना-राऊत

मुंबई वाचवायची असेल, मराठी माणसाला वाचवायचं असेल तर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी महापालिका निवडणुका एकत्र लढल्या पाहिजेत ही लोकभावना आहे.कोण दीपक केसरकर? दहा पक्ष फिरुन आलेल्या माणसाला उद्धव ठाकरेंनी मंत्री केलं. तुम्ही जरा स्वतःला प्रश्न विचारा मग आम्हाला विचारा. दीपक केसरकर हा बेईमान माणूस आहे. सावंतवाडीच्या आसपास एक मोती तलाव आहे. त्या तलावाच्या आसपास असे अनेक कावळे फडफडत असतात. त्यातला मोती तलावावरचा हा कावळा आहे. असं संजय राऊत यांनी म्हटलं आहे.

## पती मेल्याचे दाखवून ३

माध्यमातून बनावट कागदपत्रांद्वारे नोंदणी केली आहे. त्यावर काही संघटनांनी आक्षेप घेत चौकशीची मागणी देखील केली आहे. मागील वर्षभरात बांधकाम कामगारांमध्ये अचानक मोठी वाढ झाल्याचेही चित्र आहे. एजंटांना काही रक्कम दिल्यास बांधकाम कामगार म्हणून नोंदणी करण्यापासून सर्व लाभ मिळेपर्यंत सर्व कामे तेच करतात, अशी स्थिती आहे. त्यातूनच या पाच जणांनी बनावट मृत्यपत्रे देऊन फसवणूक केल्याचा पोलिसांना संशय आहे. सहायक पोलिस निरीक्षक विजय जाधव तपास करीत आहेत.

'या' पाच जणांवर गुन्हा, आता पुढे...

बनावट मृत्युपत्रे सादर करून शासनाची फसवणूक केल्याच्या प्रकरणात शोभा काशिनाथ वाघमारे (रा. सोहाळे, ता. मोहोळ), मनोज रतनलाल अवस्थी (रा. शामा नगर, मोदी), शैला सुरेश भांगे (रा. लक्ष्मी गल्ली, अक्कलकोट), सुनीता संजय कोळी (रा. मुकुंद नगर, भवानी पेठ, सोलापूर) व वैशाली नागनाथ जेऊरे (रा. कामगार वसाहत भाग-एक, सोलापूर) यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल झाला आहे. संबंधितांना नोटीस बजावण्यात आल्या असून त्यांना पोलिस ठाण्यात बोलावून त्यांच्याकडे सखोल चौकशी केली जाणार आहे.

योजना नेमकी काय आहे?

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून नोंदणीकृत कामगारांसाठी विविध योजना आहेत. त्यात नोंदणीकृत कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या वारसाला दोन लाखांची मदत मिळते. त्यासाठी ऑनलाइन कागदपत्रे अपलोड करावी लागतात. मदत मिळविण्यासाठी संबंधित कामगाराचे स्थानिक स्वराज्य संस्थेकडील मृत्युपत्रे बंधनकारक आहे.

१५०० कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात सुमारे १५०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याचा संशय असून चौकशीसाठी राज्याचे विकास आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त समिती स्थापन करावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष बशीर अहमद यांनी केली आहे. मंडळाच्या माध्यान्ह भोजन, बांधकाम कामगार जनआरोग्य योजना, तपासणी ते उपचार योजना, माहिती पुस्तिका, सुरक्षा संच, गृह उपयोगी वस्तूसंच यामध्ये भ्रष्टाचार झाला आहे. सोमवारपर्यंत (ता. १४) स्वतंत्र समिती स्थापन करून करून सखोल चौकशी करावी, अन्यथा बुधवारपासून सोलापुरात आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही अहमद यांनी दिला आहे.

## मालमत्ता कर थकीत

नाही. महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १५० नुसार (१) (अ) बिलाच्या न भरलेल्या रक्कमेवर दरमहा २ टक्के दंड मालमत्ता धारकांच्या एकूण थकबाकीमध्ये लावण्याचे प्रावधान आहे. शास्ती % यावर उपाययोजना म्हणून नगरपरिषद क्षेत्रातील थकीत मालमत्ता दरात वाढ होऊन याचे विपरित परिणाम कर वसुलीवर होतो. वरील शास्ती माफ करुन कर वसुली करण्यासाठी प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीने अभय योजना लागू करण्याबाबत शासनस्तरावर विचार करण्यात आलेला आहे.

तसेच अभय योजना ही एकदाच लागू आहे. थकीत मालमत्ता कराच्या रक्कमेवरील फक्त शास्तीस (दंड) अभय योजना लागू आहे. अभययोजना थकीत मालमत्ता कर वसुलीसाठी प्रोत्साहन पर आहे. जे मिळकत धारक शास्ती (दंड) वगळता इतर थकीत मालमत्ताकर जसे की पाणीपट्टी, वृक्ष कर, अग्निशमन कर, शिक्षण कर, घनकचरा कर संपूर्ण रक्कम भरतील त्यांच्या बाबतीतच शास्तीच्या (दंड) सवलतीचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात येईल. सदर योजनेचा लाभ देणे कामी नगर परिषदेकडे मिळकत धारकांनी प्रस्ताव / विहित नमुन्यात अर्ज देणे आवश्यक आहे. जे मिळकत धारक अभय योजनेचा लाभ घेऊ इच्छित असलेल्यांकडून विहित नमुन्यात प्रकरण ५० टक्के किंवा त्याहून जास्त सवलत मागणी करिता परिपूर्ण प्रस्ताव बीड नगर परिषदेकडे सादर करावा लागेल. विहित नमुना नगरपरिषदेच्या कार्यालयात उपलब्ध असून, त्या नमुन्यात अर्ज सादर करावा. दिनांक १९/०५/२०२५ नंतरच्या थकबाकी शास्तीस (दंड) अभय योजना लागू राहणार नाही. प्रस्ताव सादर करताना आधार कार्ड छायांकित प्रत, मालमत्ता कराची मागणी बिल छायांकित प्रत, संपूर्ण कर कराची रक्कम भरलेल्या पावतीची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. सदर प्रस्ताव/विहित नमुन्यातील अर्ज दि. ०३/०७/२०२५ पासून ते दि. ०८/०८/२०२५ पर्यंत बीड नगरपरिषद कार्यालयात सादर करावा. तरी थकीत शास्ती (दंड) वगळता कराची इतर रक्कम तात्काळ भरुन शास्ती (दंड) माफी अभय योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नगरसेवक अमर नाईकवाडे, गटनेते फारुक पटेल यांनी केले आहे.

काय आहे अभय योजना?

दि. ०३/०७/२०२५ पासून ते दि. ०८/०८/२०२५ कालावधीत चालू राहणार्या या अभय योजनेनुसार थकबाकीदारांनी ३१ जानेवारीपर्यंत मालमत्ता कराची थकबाकी भरल्यास त्यांना व्याजाच्या रक्कमेत ५० टक्के सूट मिळणार आहे. तसेच दिनांक १९/०५/२०२५ नंतरच्या थकबाकी शास्तीस (दंड) अभय योजना लागू राहणार नाही.